# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १ जुलै, २०२४

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री** : "श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षांचा लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील

(२) **उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री** : "वस्तू व सेवा कर संस्था (GSTN) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शनिवार, दिनांक २९ जून, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ] —**

(१) **श्री.सत्यजीत तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सध्या राज्यातील ९९९ रुग्णालयांचा समावेश असणे, राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये या योजनेअंतर्गत मोफत उपचार होणारे एकही हॉस्पिटल नसल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच सदरील योजनेमध्ये काही आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया जिल्हा शासकीय रुग्णालयात करण्यात येत असणे, ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना जिल्हा रुग्णालयांमध्ये जाणे शक्य होत नसल्यामुळे

अग्रिम प्रत

अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहत असणे, त्यामुळे जिल्हा शासकीय रुग्णालयातील राखीव आजार योजनेतील समाविष्ट सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये देखील लागू करावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, तसेच राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये या योजनेअंतर्गत मोफत उपचार होणारे एक तरी रुग्णालय असावे त्यासाठी आणखी ५०० दवाखान्यांचा योजनेत समावेश करावा अशीही मागणी लोकप्रतिनिधींनी केली असणे, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दंत वैद्यकीय उपचारांचा समावेश नसल्यामुळे रुग्णांना महागडे खाजगी उपचार घ्यावे लागत असणे, त्यामुळे या योजनेत दंत वैद्यकीय उपचार करण्याची सुद्धा मागणी होत असणे, उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री अभिजित वंजारी**, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, निलय नाईक, रमेश कराड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर महानगरपालिकेमध्ये २० वर्षे सेवा देणाऱ्या ऐवजदार सफाई कामगारांना सन २०१४ ते २०१९ या कालावधीत सेवेत कायम करण्यात आले असणे, यातील बऱ्याच ऐवजदार कामगारांनी स्थायी झाल्यानंतर वयोमानानुसार केवळ सहा तर दोन-तीन महिनेच सेवा देऊन ते सेवानिवृत्त झाले असणे, तर काहींचे अल्पावधीतच निधन झाले असणे, त्यामुळे या सफाई कामगारांच्या कुटूंबियांना स्थायी वेतनाचा हवा तसा लाभ न मिळणे, त्यांना सेवानिवृत्ती पेन्शनही न मिळणे, त्यामुळे त्यांचे कुटूंबिय सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासापासून मागे पडत असणे, तसेच कामगाराचे निधन झाल्यास किंवा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदावर त्यांच्या वारसदारांना "लाड-पागे" समितीच्या शिफारशीनुसार नियुक्तीचा लाभ नियोजितरित्या देण्यात न येणे, परिणामी या ऐवजदार कामगारांवरच अन्याय होत असल्याचे मत जनमानसांत निर्माण होणे, त्यामुळे सफाई कामगारांमध्ये निर्माण झालेला प्रचंड संताप व असंतोष, पूर्वी महानगरपालिकेत स्थायी सफाई कामगारांना "लाड-पागे" समितीच्या शिफारशी लागू होत असणे व त्यांच्या पश्चात वारसांना शिफारशीनुसार महानगरपालिकेत नोकरी दिली जात असणे, तसेच कर्मचाऱ्यांच्या आवास योजनेकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना कालबद्ध कृती कार्यक्रम आखून

अप्रकाशित प्रत

अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने विचारविनिमय करुन स्थायी कामगारांना (ऐवजदारांना) "लाड-पागे" समितीच्या शिफारशी लागू करण्याकरीता तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.प्रविण दरेकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहराची साफसफाई योग्यरित्या होत नसल्याचे कारण देत झोपडपट्टीतील स्वच्छतेचे काम सामाजिक संस्थांकडून काढून घेऊन नव्या कंपन्यांना स्वच्छतेचे कंत्राट देण्याचा मुंबई महापालिकेने घेतलेला निर्णय, सदरील साफसफाईचे कंत्राट हे ४ वर्षांसाठी असून सुमारे १२०० कोटी रुपयांचे त्याचे अंदाजपत्रक असल्याचे निदर्शनास येणे, सद्य:स्थितीत ही कामे बेरोजगार संस्था, सेवा, अपंग, महिला संस्था व महिला बचत गटाकडून करण्यात येत असून महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फतही झोपडपट्टयांमधून घराघरातून कचरा जमा केला जात असणे, या परिसरातील जागा, ड्रेनेज व शौचालय, स्वच्छतागृह, जाळी साफसफाई आदी कामे या विभागामार्फत करण्यात येणे, या स्वच्छतेसाठी लाखो रुपये मोजून कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात येणार असल्याने बेरोजगार, सेवा, अपंग व महिला आणि महिला बचत गट अशा सुमारे २ ते अडीच हजार संस्था बंद पडून सुमारे ७५ हजार कामगारांमध्ये बेकारीची कुऱ्हाड कोसळणार असल्याने सफाई कामगारांत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सद्यस्थितीत या सफाई कामगारांना दरमहा ६ हजार रुपये मानधन दिले जात असून नवीन निविदेची अंमलबजावणी झाल्यास एका कामगाराला दरमहा २१,८०० रुपये मानधन मिळणार असल्याने सदरील निर्णय रद्द करुन आताचे जे कामगार आहेत त्यांनाच हे काम देऊन २१,८०० रुपये मानधन द्यावे, अशी बृहन्मुंबई बेरोजगार फेडरेशन तसेच सफाई कर्मचाऱ्यांकडून महापालिकेकडे होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सातारा जिल्ह्यामध्ये औद्योगिक क्षेत्र वाढविण्यासंदर्भात सेक्टर उभारण्याबाबत सतत होत असलेली मागणी, जिल्ह्यातील अनेक पदवीधर

असुधारित प्रत

दुसऱ्या जिल्ह्यामध्ये जात असल्यामुळे येथेच आयटी सेक्टर किंवा एमआयडीसीचा विस्तार व्हावा अशाप्रकारची सातत्याने होत असलेली मागणी, पाण्याची उपलब्धता, औद्योगिक क्षेत्रासाठी मुंबईच्या जवळ असलेले ठिकाण वाहतुकीसाठी सोईचे आहे म्हणून सातारा जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणी औद्योगिक क्षेत्र उभे करण्याची वारंवार होत असलेली मागणी, सातारा, पुसेगाव तसेच सातारा येथे नियोजित औद्योगिक क्षेत्रासाठी प्रस्ताव तयार करण्यात येणे, परंतु अद्यापही त्याची अंमलबजावणी न होणे, पुणे जवळ असणाऱ्या शिरवळ येथे आयटी हब उभारण्याकरिता होत असलेली मागणी, तसेच सातारा एमआयडीसीमध्ये महाराष्ट्र स्कूटर्स ही कंपनी अनेक वर्षापासून बंद असणे, त्याची जमीन एमआयडीसीने ताब्यात घेऊन तेथे नवीन इंडस्ट्री उभी करुन विकसित करावी अशी होत असलेली मागणी, यामुळे येथील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल व त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी व्यक्त करण्यात येत असलेली आशा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, सचिन अहिर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मालाड, मुंबई येथील एका डॉक्टरने ऑनलाईन मागवलेल्या आईस्क्रिममध्ये मानवी बोटाचा तुकडा सापडल्याची धक्कादायक घटना दिनांक १२ जून, २०२४ रोजी घडलेली असणे, संबंधित डॉक्टरने डिलिव्हरी ॲपद्वारे तीन यम्मो आईस्क्रिमची ऑर्डर दिली असता त्यापैकी एकामध्ये आढळून आलेला मानवी बोटाचा तुकडा, सदरहू घटनेमुळे राज्यातील अन्न सुरक्षेबाबत निर्माण झालेली चिंता, अन्नामध्ये आढळणारे मृत कीटक आणि इतर दूषित घटकांचा समावेश असलेल्या राज्यातील अलीकडील घटनांनी स्वच्छतेच्या मानकांमधील गंभीर त्रुटी ठळक केल्या असणे, सदरहू घटनेमुळे अन्न सुरक्षा मानकांचे गंभीर उल्लंघन अधोरेखित झाले असणे, मध्यान्ह भोजन आणि रेल्वे कॅटरिंग यासारख्या सरकारी नियंत्रित सेवा देखील रोगप्रतिकारक नसणे, सदरहू घटनेमुळे संबंधित अधिकारी आणि अन्न वितरण सेवा यांच्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे आणि अधिकाऱ्यांत जबाबदारीचा अभाव असल्याचे समोर येणे, परिणामी राज्यातील ग्राहकांमध्ये निर्माण झालेली तीव्र संतापाची भावना आणि चिंतेचे वातावरण, यास्तव

अप्रकाशित प्रत

सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.जयंत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू केल्या असता, ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशु संख्येचे २२ कोटी ५४ लाख २७ हजार २९९ इतके समर्पित झालेले अनुदान मिळण्याच्या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दिनांक २८ एप्रिल, २००६ व दिनांक १० जुलै, २०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती गठीत करून सुधारीत प्रस्ताव राज्य शासनास जिल्हाधिकारी, सोलापूर, विभागीय आयुक्त, पुणे यांनी सादर करण्यात न येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१ कोटी ४७ लाख १४ हजार ९२२ रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२ कोटी २० लाख ९६ हजार २५१ रूपये इतक्या अनुदानाची रक्कम प्रलंबित असल्याने, राज्य शासनाकडून अनुदान तात्काळ वितरीत करण्याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी बैठक घेऊन सदर चारा छावण्यांची कागदपत्रांसह पुनःपडताळणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात येणे, परंतु अद्याप चारा छावण्यांची पुनःपडताळणी होऊनही शासनाकडे अहवाल सादर न झाल्याने अनुदानाची रक्कम वितरित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

असुधारित प्रत

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**सात : शासकीय विधेयक –**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

"सन २०२४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४"

**आठ : (शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ व शनिवार, दिनांक २९ जून, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अरुण लाड, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात सततचा पाऊस, नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा यामुळे शेतकरी संकटात आलेला असणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये झालेली वाढ, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहिर करुनही अद्याप शेतकरी वंचित असणे, पीक विम्याचे नियमितपणे हप्ते भरुनही शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहणे, तथापि, विमा कंपन्या दिवसेंदिवस मालामाल होणे, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई असताना टँकर माफीयांकडून नागरिकांची होत असलेली लूट, पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात आलेली "हर घर नल का जल" योजना अपयशी ठरणे, चारा छावण्या उभारण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, परिणामी पशुधनाचे झालेले नुकसान, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संकटात असताना शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याकडे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, माहे जानेवारी ते मे, २०२४ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ

अग्रिम प्रत

मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान अद्यापही मिळालेले नसणे, राज्य सरकारने ७५ हजार पद भरती करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अजूनही पुर्तता केलेली नसणे, त्यामुळे अनेक तरुण-तरुणी रोजगारापासून वंचित असणे, जुन्या पेन्शन योजनेत असलेल्या त्रुटी, शिक्षकांच्या संच मान्यतेमध्ये असलेल्या त्रुटी, शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध असून प्रकल्प रेटण्याचा सुरु असलेला प्रयत्न, स्मार्ट प्रिपेड योजनेमुळे ठराविक उद्योजकांना फायदा होणार असणे, वीज दरामध्ये झालेली वाढ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रलंबित असणे, महागाईत झालेली वाढ, राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमध्ये झालेली अनियमितता, तसेच गत दोन वर्षात शासनाच्या विविध विभागामध्ये अनेक भ्रष्टाचार व गैरव्यवहार उघडकीस येणे, कृषी उद्योग विकास महामंडळामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मेटाल्डिहाइड कीटकनाशके, कापूस साठवणपिशव्या, फवारणी पंप, डिजिटल मृदा आर्द्रता संवेदक या निविष्ठांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या जाणीवपुर्वक दुर्लक्षामुळे अखर्चित राहणे, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास विभागात फर्निचर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत गैरप्रकार, जेष्ठता डावलून पदस्थापना, औषध खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा गैरव्यवहार, कामगार विभागांतर्गत बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, वाळू धोरण राबविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांची वाळू माफियांकडून होत असलेली फसवणूक, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमीनीची अत्यल्प दरात केलेली खरेदी, निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देणग्या देणाऱ्या कंपन्यांना राज्यातील विविध प्रकल्पांची कोट्यवधी रुपयांची देण्यात आलेली कंत्राट, संचालक, नगररचना, पुणे यांनी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचे योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे हा

अप्रमाणित प्रत

निधी व्यपगत होणे, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीत राजकीय दबावापोटी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार, पाणी पुरवठा विभागात जलजीवन मिशन अंतर्गत कामाचे वाटप करताना ई-निविदा न राबविता केलेला गैरव्यवहार, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** रमेश कराड, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन आंतरजिल्हा बदली प्रक्रियेत संवर्ग एक मध्ये येणाऱ्या शिक्षकांना प्राधान्य देण्यात आले असणे, जेणेकरून त्यांच्या अडचणी दूर होऊन त्यांना सेवा उत्तमरित्या करता यावी परंतु प्राधान्य देऊनही संवर्ग एक मधील सर्वच शिक्षकांच्या बदल्या झालेल्या नसणे, ज्यांच्या बदल्या झालेल्या नाहीत ते शिक्षक अद्यापही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता सेवा बजावत असताना १५ ते २० वर्षांपासून स्वतःच्या जिल्ह्यापासून दूर असणे, त्यामुळे त्यांचे कुटुंब व ते प्रचंड मानसिक कुचंबणेत आणि हलाखीचे जीवन जगत असणे, वैद्यकीय व इतर अनुषंगिक होणारी ससेहोलपट याबाबतचा सहानुभूतीपूर्वक विचार होऊन त्यांची त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यात बदली होण्यासाठी कोणतीही अट न ठेवता त्यांना बदली देण्यात यावी, अशी मागणी अनेक लोकप्रतिनिधी व शिक्षक संघटना यांच्याकडून शासनाकडे करण्यात येणे, परंतु याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री प्रसाद लाड,** प्रविण दरेकर, रमेश पाटील, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मुंबई शहर व उपनगरामध्ये प्रवाशांना अविरत परिवहन सेवा तसेच मुंबई शहरात ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा करणाऱ्या बेस्ट उपक्रमातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, बेस्ट उपक्रमातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची भरती व पदोन्नती थांबविल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रवासी भाड्याचे दर कमी करण्याची अट ठेवल्यामुळे बेस्ट उपक्रमाची तुट

अग्रिम प्रत

चौपटीने वाढली असणे, बेस्टचे उत्पन्न वाढविण्याकरिता बेस्ट उपक्रमाच्या २७ आगारांच्या जागेवर स्वमालकीच्या भूखंडाचा व्यावसायिक तत्वावर विकास केल्यास तसेच बेस्टच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या वसाहतींचा पुनर्विकास करून ज्याप्रमाणे गिरणी कामगार, बी.पी.टी. कामगार, पोलीस कर्मचारी यांच्या धर्तीवर किफायतशीर दरात घरे दिल्यास बेस्ट कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करून व उर्वरित जागेचा व्यावसायिक वापर केल्यास बेस्टच्या उत्पन्नात वाढ होईल, त्यामुळे डबघाईस आलेल्या बेस्टला उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होऊन मुंबईकरांना दर्जेदार सेवा मिळू शकेल, बेस्ट उपक्रमास नव्याने उभारी देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २९ जून, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत